THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 21st NOVEMBER 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७९ चा वकिली करणारांबाबद आक्ट सुधारण्यासाठींच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं सन १८७९ चा वकिली करणारांबाबद आक्ट सुधारणें इष्ट आहे त्या अर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सन १८७९चा आक्ट १८वा, कलम १३, याच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

१. सदरहू आक्टाच्या १३ व्या कलमाच्या बदला खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें:—

धंद्यास अनुचित अशा रीतीच्या वर्तणुकीबद्दल प्लीडर व मुख्त्यार ह्यांस सस्पेंड व बर्तर्फ करणें.

"१३. हाय कोर्ट, त्यास योग्य वाटेल तशी चौकशी केल्यानंतर, सदरीं सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या कोणत्याही प्लीडरास अगर मुख्त्यारास—

(अ) तो, एकाद्या मुकदम्यांत आपल्याला ज्या पक्षकाराच्या तर्फेनें राखून ठेविलेलें असेल त्या पक्षकाराशिवाय अथवा अशा पक्षकाराच्या खासगी नोकराशिवाय अथवा जो मनुष्य दिवाणी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा ह्याच्या अर्थाअन्वयें अशा पक्षकाराचा मंजूर केलेला एजंट असेल त्या मनुष्याशिवाय इतर कोणाकडून तो मुकदमा समजून घेईल तर, त्याबद्दल, अगर

(ब) तो, आपल्या धंद्यासंबंधी काम चालविण्याच्या बाबतींत दगलबाजीचें अगर अतिशय अयोग्य असें वर्तन केल्याचा अपराधी होईल तर, त्याबद्दल, अगर

(क) तो, कोणतेंही कायद्यासंबंधी काम आपल्यास अगर वर सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या इतर कोणत्याही प्लीडरास किंवा मुख्त्यारास मिळवून देण्याबद्दल अगर मिळवून दिल्याबद्दल कोणतीही देणगी देऊं लागेल, देईल अगर ठेऊन घेण्यास संमति देईल तर, त्याबद्दल, अगर

(ड) तो, कोणतेंही कायद्यासंबंधाचें काम, जो इसम वर सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणारा प्लीडर अगर मुख्त्यार नाहीं असें स्वतःस माहीत असेल अगर तसें मानण्यास स्वतःस कारण असेल, आणि जो

इसम तें काम कांहीं ऐवज घेतल्याशिवाय आणून देत नसेल, त्या इसमाच्या मार्फत अगर जो इसम हमेश दलालाप्रमाणें काम करीत असेल त्या इसमामार्फत घेईल तर, त्याबद्दल, अगर

(इ) इतर कोणत्याही वाजवी कारणाबद्दल

सस्पेंड करण्यास अगर बर्तर्फ करण्यासही मुखत्यार आहे.

मात्र असें ठरविलें आहे कीं, जेव्हां पक्षकार—

(अ) पडद्यांतली स्त्री असेल, अगर

(ब) कोणत्याही पुरेशा कारणामुळें प्लीडरास अगर मुखत्यारास जातीनें मुकदमा समजून देण्यास असमर्थ असेल,

तेव्हां कोणत्याही प्लीडरास अगर मुखत्यारास मुकदमा समजून देण्याचा अधिकार अशा पक्षकारानें आपल्या ज्या नातेवाइकास अथवा मित्रास दिलेला असेल आणि जो अशी समजूत देण्याबद्दल कोणताही मेहनताना घेणार नसेल, त्या नातेवाइकाकडून अगर मित्राकडून त्या प्लीडरानें अथवा मुखत्यारानें तो मुकदमा समजून घेतला एवढ्याच कारणावरून तो प्लीडर अगर मुखत्यार सस्पेंड अगर बर्तर्फ होण्यास पात्र होतो असें ह्या कलमांतील कोणत्याही मजकुरावरून समजूं नये.

खुलासा.—अमुक इसम हमेश दलालाप्रमाणें काम करीत असतो, असें ह्या कलमाच्या कारणांसाठीं, त्याच्या साधारण कीर्तीचा पुरावा देऊन अगर इतर रीतीनें शाबीत करण्याचा अधिकार आहे; आणि ज्या कोणत्याही प्लीडरानें अगर मुखत्यारानें अशा कोणत्याही इसमाकडून काम घेतलें असेल, त्या प्लीडरास किंवा मुखत्यारास तो इसम हमेश दलालाप्रमाणें काम करणारा होता ही गोष्ट माहीत नव्हती हें शाबीत करण्याचा बोजा अशा प्लीडरावर अगर मुखत्यारावर पडेल."

सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम १४, ह्याची सुधारणा.

२. सदरहू आक्टाच्या १४ व्या कलमांत, "आणि त्याबद्दल हाय कोर्टाकडे रिपोर्ट करावा" हा मजकुर आहे तो धरून त्यापुढच्या त्या कलमांतल्या मजकुराऐवजीं, खालील मजकुर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें :—

"आणि असा अमलदार डिस्ट्रिक्ट जज्ज अगर सेशन जज्ज अगर भागाचा कमिशनर असेल तो प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, त्या अमलदारानें त्या गोष्टीचा रिपोर्ट, ह्यासंबंधानें ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या कोर्टाकडे अगर अधिकाऱ्याकडे केला पाहिजे, आणि अशा कोर्टानें अगर अधिकाऱ्यानें, सदरहू रिपोर्ट पोंचला ह्मणजे, त्या प्लीडराचें अगर मुखत्याराचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर केलेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर, हुकूम करून, त्या प्लीडरास अगर मुखत्यारास निर्दोषी ठरविलें पाहिजे अगर त्या हुकुमांत निर्दिष्ट करावयाच्या मुदतीपर्यंत त्यास कामावरून सस्पेंड केलें पाहिजे, अगर त्यास बर्तर्फ केलें पाहिजे.

असा अमलदार डिस्ट्रिक्ट जज्ज अगर सेशन जज्ज अगर भागाचा कमिशनर असेल तेव्हां त्यास, आपल्याच अधिकारावर, त्या प्लीडराचें अगर मुखत्याराचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर केलेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर लगत वरच्या रकमेंत निर्दिष्ट केलेल्या प्रकारचा हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

असा कोणताही हुकुम ज्या प्लीडराच्या अगर मुखत्याराच्या संबंधाचा असेल, त्यास, त्या हुकुमाच्या तारिखेपासून एका महिन्याच्या आंत त्या हुकुमावर हाय कोर्टाकडे अपील करण्याचा अखत्यार आहे; आणि त्या हाय कोर्टास, अपेलंटाचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर केलेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर, ज्या हुकुमावर अपील केलेलें असेल तो हुकुम बाहाल करण्याचा, रद्द करण्याचा अगर बदलण्याचा अगर त्या हुकुमाच्या बदला वाजवी असा दुसरा कोणताही हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

ह्या कलमाअन्वयें करावयाचा दरेक रिपोर्ट—

(अ) डिस्ट्रिक्ट जज्जाच्या ताब्यांतल्या कोणत्याही दिवाणी कोर्टाच्या जज्जानें अशा डिस्ट्रिक्ट जज्जाकडे केला पाहिजे;

(ब) जिल्हा माजिस्ट्रेट धरून कोणत्याही माजिस्ट्रेटानें सेशन जज्जाकडे केला पाहिजे ;

(क) भागाच्या कमिशनराच्या ताब्यांतील अगर जेथें असा कमिशनर नसेल तेथें निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याच्या ताब्यांतील कोणत्याही मुलकी कचेरीच्या मुख्य अमलदारानें, अशा कमिशनराकडे अगर अधिकाऱ्याकडे केला पाहिजे."

३. सदरहू आक्टाच्या २२ व्या कलमाच्या ऐवजीं खालील कलम दाखल करावें: तें येणेंप्रमाणें :— सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम २२, याच्या ऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

धंद्यास अनुचित अशा रीतीच्या वर्तणुकीबद्दल रेव्हिन्यू एजंटसां सस्पेंड व बर्तर्फ करणें.

"२२. निर्बंध ठेवणारा मुख्य मुलकी अधिकारी, त्यास योग्य वाटेल तशी चौकशी केल्यानंतर, ह्या आक्टाअन्वयें दिलेलें सर्टिफिकेट धारणकरणाऱ्या कोणत्याही रेव्हिन्यू एजंटास—

(अ) तो, आपल्या धंद्यासंबंधी काम चालविण्याच्या बाबतींत दगलबाजीचें अगर अतिशय अयोग्य असें वर्तन केल्याचा अपराधी होईल तर, त्याबद्दल, अगर

(ब) तो, कोणतेंही कायद्यासंबंधी काम आपल्यास अगर वर सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणाऱ्या इतर कोणत्याही रेव्हिन्यू एजंटास मिळवून देण्याबद्दल अगर मिळवून दिल्याबद्दल कोणतीही देणगी देऊं लागेल, देईल अगर ठेऊन घेण्यास संमति देईल, तर, त्याबद्दल, अगर

(क) तो, कोणतेंही कायद्यासंबंधाचें काम, जो इसम वर सांगितल्याप्रमाणें सर्टिफिकेट धारण करणारा रेव्हिन्यू एजंट नाहीं असें स्वतःस माहीत असेल अगर तसें मानण्यास स्वतःस कारण असेल आणि जो इसम तें काम कांहीं ऐवज घेतल्याशिवाय आणून देत नसेल, त्या इसमाच्या मार्फत अगर जो इसम हमेश दलालाचें काम करीत असेल त्या इसमामार्फत घेईल, तर, त्याबद्दल, अगर

(ड) इतर कोणत्याही वाजवी कारणाबद्दल,

सस्पेंड करण्यास अगर बर्तर्फ करण्यासही मुखत्यार आहे.

खुलासा :—अमुक इसम हमेश दलालाप्रमाणें काम करीत असतो असें, ह्या कलमाच्या कारणांसाठीं, त्याच्या साधारण कीर्तीचा पुरावा देऊन अगर इतर रीतीनें शाबीत करण्याचा अधिकार आहे; आणि ज्या कोणत्याही रेव्हिन्यू एजंटानें अशा कोणत्याही इसमाकडून काम घेतलें असेल, त्या रेव्हिन्यू एजंटास तो इसम हमेश दलालाचें काम करणारा होता ही गोष्ट माहीत नव्हती हें शाबीत करण्याचा बोजा अशा रेव्हिन्यू एजंटावर पडेल."

४. सदरहू आक्टाच्या २३ व्या कलमांत, "आणि त्याबद्दल निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याकडे रिपोर्ट करावा" हा मजकूर आहे तो धरून त्यापुढच्या त्या कलमांतल्या मजकुराऐवजीं खालील मजकुर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:— सन १८७९ चा आक्ट १८ वा, कलम २३ यानी सुधारणा.

"आणि असा अमलदार भागाच्या कमिशनराच्या ताब्यांतला अमलदार असेल अगर मुनसफ असेल, तेव्हां त्यानें त्या गोष्टीचा रिपोर्ट त्या कमिशनराकडे, अगर जेथें असा कमिशनर नसेल तेथ निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याकडे केला पाहिजे; आणि अशा कमिशनरानें अगर अधिकाऱ्यानें, असा रिपोर्ट पोंचला ह्मणजे, त्या

रेव्हिन्यू एजंटाचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर केलेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर, हुकुम करून, त्या रेव्हिन्यू एजंटास निर्दोषी ठरविलें पाहिजे, अगर त्या हुकुमांत निर्दिष्ट करावयाच्या मुदतीपर्यंत त्यास सस्पेंड केलें पाहिजे, अगर त्यास बर्तर्फ केलें पाहिजे.

असा अमलदार भागाचा कमिशनर असेल तेव्हां त्यास, आपल्याच अधिकारावर, त्या रेव्हिन्यू एजंटाचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर झालेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर, लगत वरच्या रकमेंत निर्दिष्ट केल्या प्रकारचा हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

भागाच्या कमिशनरानें काढलेला असा कोणताही हुकुम ज्या रेव्हिन्यू एजंटाच्या संबंधाचा असेल, त्यास, त्या हुकुमाच्या तारिखेपासून एका महिन्याच्या आंत, त्या हुकुमावर, निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अखत्यार आहे, आणि सदरहू अधिकाऱ्यास, अपेलंटाचें अगर त्याच्या वतीनें त्याच्या मंजूर केलेल्या एजंटाचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर, ज्या हुकुमावर अपील केलें असेल तो हुकुम बाहाल करण्याचा, रद्द करण्याचा अगर बदलण्याचा अगर त्या हुकुमाच्या बदला वाजवी असा दुसरा कोणताही हुकुम करण्याचा अखत्यार आहे."

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

जो कोणताही मनुष्य, वकिली करणाऱ्या कोणत्याही मनुष्यास काम आणून देण्याचा मोबदला ह्मणून त्यापासून दलाली मागेल अगर घेईल तो मनुष्य, आणि त्याचप्रमाणें, वकिली करणारा जो मनुष्य अशी दलाली देईल अगर देऊं लागेल तो मनुष्य, सन १८७९ चा आक्ट १८ वा ह्याच्या ३६ व्या कलमाअन्वयें गुन्हेगार ठरतो. ह्या ठरावाचा उद्देश, कायद्यासंबंधी दलालीचा प्रचार बंद पाडावा असा होता, परंतु दलाली खरोखर देऊं लागल्याची, घेतल्याची अगर दिल्याची गोष्ट शाबीत करण्याची जी मुष्कील पडते, तिमुळें तो ठराव सदरहू हेतु सिद्धीस नेण्याच्या कामीं पुरेसा नाहीं असें दिसतें; आणि तो ठराव जो वाईट प्रचार दूर करण्याच्या कारणासाठीं दाखल केला होता तो प्रचार नाहींसा न होतां उलट वाढत जाऊन त्याच्या योगानें लोकांचें व वकिली करणाऱ्या लोकांचें जें खरें हित त्यास धोका पोंचत आहे असें वाटतें.

हा मसुदा, कलकत्ता हाय कोर्टाकडून आणविलेल्या विवाक्षित सूचनांच्या धोरणावर तयार करण्यांत आला आहे आणि त्याअन्वयें सदरहू आक्टाची अशी सुधारणा करण्याचें योजिलें आहे कीं, त्यावरून, वकिली करणारा जो कोणताही मनुष्य (मग तो प्लीडर असो अगर मुखत्यार असो अगर रेव्हिन्यू एजंट असो) कोणत्याही दलालामार्फत कोणतेंही कायद्यासंबंधाचें काम घेईल, तो, त्याबद्दल, प्रसंगाप्रमाणें, जिल्ह्याच्या मुख्य दिवाणी अगर मुलकी जज्जाकडून सस्पेंड केला जाण्यास अगर बर्तर्फ केला जाण्यास पात्र होईल; आणि ह्या कायद्याचा जास्त उपयोग व्हावा ह्यासाठीं एक खुलासा दाखल करून असें ठरविलें आहे कीं, अमुक मनुष्य हमेश दलालाचें काम करीत असतो असें साधारण कीर्तीच्या पुराव्यावरून अगर इतर रीतीनें शाबीत केलें असतां चालेल; मात्र, वकिली करणाऱ्या ज्या इसमावर अशा दलालामार्फत काम घेतल्याचा आरोप आलेला असेल त्या इसमास, तो मनुष्य हमेश दलालाप्रमाणें काम करीत असल्याची गोष्ट माहीत नव्हती हें शाबीत करण्याचा बोजा त्या इसमावर घातलेला आहे. तथापि, सस्पेंड व बर्तर्फ करण्याचा जो जास्त अधिकार देण्यांत आला आहे तो वापरण्यांत आला तर त्यावर हाय कोर्टांत अपील करतां येईल.

तारीख १२ माहे आगस्ट सन १८९५. (सही) अलेक्झांडर एडवर्ड मिल्लर.

(True Translation).

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## होम डिपार्टमेंट.

### पब्लिक.

मुकाम सिम्ला, तारीख ३ माहे आक्टोबर सन १८९५.

नंबर १९६२.—हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १४१७, तारीख २४ माहे जून सन १८८७, ह्यांत, वारी पदार्थ इकडून तिकडे पाठविण्याचें व ते बाहेरून आणण्याचें नियमन करण्याच्या बाबतींत प्रसिद्ध केलेल्या कानूंमध्यें, एक कानू जास्त दाखल करण्याचें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं योजिलें आहे; त्या कानूचा मसुदा, हिंदुस्थानचा वारी पदार्थांविषयीं आक्ट (सन १८८४ चा ४ था) ह्याच्या १८ व्या कलमाच्या (१) पोट कलमांतील ठरावास आणि हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सप्टेंबर सन १८८७, ह्यांतील हुकुमांस अनुसरून, त्यांनीं लोकांच्या माहितीसाठीं खालीं प्रसिद्ध केला आहे.

ह्या जाहिरनाम्याच्या तारिखेनंतर दोन महिने लोटले म्हणजे ह्या मसुद्याचा विचार करण्यांत येईल.

### कानूचा मसुदा.

९. (३) वर्ग ३ (नैट्रो कंपौंडचा वर्ग) ह्यांत अगर वर्ग ५ (फलिमिनेटचा वर्ग) ह्यांत मोडणारा कोणताही वारी पदार्थ, ज्या सार्वजनिक पुलावरून तो पदार्थ रेलवेनें नेण्याची वाजवी सवड असून रेलवे आड्मिनिस्ट्रेशन त्या सवडीचा फायदा घेऊं देत असेल त्या सार्वजनिक पुलावरून रेलवेशिवाय इतर कोणत्याही रीतीनें नेऊं नये.

ज्या ज्या पुलाच्या बाबतींत ही मनाई लागू असेल, त्या प्रत्येक पुलावर, लोकांच्या माहितीसाठीं, अशी एक जाहिरखबर लावावी कीं, त्या पुलावरून, सदरील वर्गांत मोडणारे वारी पदार्थ रेलवेशिवाय इतर रीतीनें नेण्याची मनाई आहे.

(सही) जे. पी. ह्युएट.

आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट, आली जनाव गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १० माहे अक्टोबर सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे.

---

# सन १८९५ चा आक्ट १५.

---

**सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट याचा, सरकाराकडून दिलेल्या इनामतींच्या संबंधापुरता, खुलासा करण्याविषयीं आणि अशा इनामतींच्या संबंधानें सरकारच्या अधिकारांबाबद कित्येक शंका आहेत त्या दूर करण्याविषयीं आक्ट.**

ज्याअर्थीं सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट याच्या व्याप्तीविषयीं व अमलाविषयीं, आणि सरकाराकडून किंवा त्याच्या अधिकाराअन्वयें करून दिलेल्या जमिनीच्या इनामती व इतर तबदिली यांच्या संबंधानें अटी व मर्यादा लागू करण्याबाबदच्या सरकारच्या अधिकाराविषयीं शंका उत्पन्न झालेल्या असून त्या दूर करणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास, सन १८९५ चा सरकारी इनामतींबाबद आक्ट, असें म्हणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबदचा आक्ट सरकारी इनामतींस लागू नाहीं.

२. सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट यांतील कोणताही मजकूर, मलिका माआझमा महाराणी कैसरेहिंद, त्यांचे वारस किंवा स्थानापन्न यांकडून किंवा यांच्यावतीनें, किंवा हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांकडून किंवा यांच्यावतीनें, कोणत्याही मनुष्यास किंवा मनुष्याकरितां, कोणतीही जमीन किंवा तींतील कोणताही हितसंबंध आजपर्यंत इनामत किंवा इतर रीतीनें तबदील करून दिलेला असेल किंवा यानंतर देण्यांत येईल त्यास लागू होणार नाहीं किंवा कधींही लागू होता असें समजूं नये; परंतु अशी दरेक इनामत व तबदील यांचा अर्थ व अमल सदरहू आक्ट पसार झालाच नाहीं याप्रमाणें केला पाहिजे.

सरकारी इनामतींच्या लेखांचा अमल त्यांच्या आशयाप्रमाणें चालणें.

३. सदरीं सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही इनामतीबाबदच्या किंवा तबदिलीबाबदच्या लेखांतील सर्व ठराव, मर्यादा, शर्ती व उत्तरव्यवस्था हीं, कायद्याचा कोणताही नियम, किंवा कायदे करणाऱ्या मंडळीचा कोणताही स्टाट्यूट किंवा कायदा उलट पक्षीं असला तथापि, कायदेशीर आहेत व त्यांचा अमल त्यांच्या आशयाप्रमाणें चालेल असें समजावें.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.